**अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींकरीता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक अशा ३५३ शासकीय निवासी शाळा सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, व विशेष सहाय्य विभाग.**
**शासन निर्णय क्रमांक:- अजाशा-२००५/प्र.क्र.४३२/मावक-४**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- १ जून , २००६**

**वाचा** :- संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक. सकसं/शिक्षण/ अजानिशा/का-५/०५-०६/५५८५ ,दिनांक ३१/८/२००५.

**प्रस्तावना :-** महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील बहुतांश व्यक्ती हया शेतमजूर किंवा लहान सीमांकित शेतकरी असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना त्यांच्या मुलांना शाळेत पाठवून त्यांचा शैक्षणिक विकास घडवून आणणे अत्यंत कठिण जाते. ही परिस्थिती लक्षात घेऊन त्यांच्याकरीता सन १९९६-९७ पासून आश्रमशाळा ही योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत राज्यामध्ये आतापर्यंत १० प्राथमिक व १ माध्यमिक अशा स्वयंसेवी संस्थांच्या एकूण ११ आश्रमशाळा कार्यान्वित आहेत. या आश्रमशाळा अपु-या असल्याने राज्य शासनाच्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये एक याप्रमाणे एकूण ३५३ निवासी शाळा सुरु करण्याचे घोषित करण्यात आले होते. त्यानुसार शासन निर्णय दिनांक ९/६/२००४ अन्वये ३५३ अनुदानित निवासी शाळा सुरु करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती आणि त्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून जाहिरातीद्वारे प्रस्ताव मागविण्यात आले होते. स्वयंसेवी संस्थांना शासनामार्फत अनुदान देऊनही या संस्थांचा दर्जा बरोबर नाही असे दिसते. स्वयंसेवी संस्थांमार्फत निवासी शाळा चालविण्यासाठी जेवढा खर्च येतो, जवळपास तेवढयाचा खर्च शासकीय निवासी शाळा सुरु करण्यासाठी येणार आहे. त्यामुळे निवासी शाळाबाबतचा मागील निर्णय रद्द करुन शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक निवासी शाळा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सन २००६-०७ च्या वित्त मंत्र्यांच्या अर्थसंकल्पिय भाषणामध्ये प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी शासकीय निवासी शाळा सुरु करण्यात येईल, असे घोषित करण्यात आले होते. तसेच अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी शासकीय निवासी शाळा सुरु करण्याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार शासकीय निवासी शाळा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी प्रत्येक तालुक्यात एक अशा एकूण ३५३ शासकीय निवासी प्राथमिक शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींकरीता इयत्ता १ ली ते ७ वी करीता मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता सुरुवातीस सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून १०० शासकीय निवासी शाळा शासनाच्या वतीने सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रत्येक निवासी शाळेमागे पहिल्या वर्षी इयत्ता १ ली साठी शिक्षक, अधिक्षक, स्वयंपाकी, मदतनीस व सफाईगार अशा एकूण ५ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. पहिल्या वर्षी इयत्ता १ ली च्या एका निवासी शाळेस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे पगार, विद्यार्थ्यांच्या परिरक्षणावरील खर्च, निवासी शाळेचे इमारत भाडे व शाळेसाठी येणा-या रु.९०३.०० लाख इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४. शासनामार्फत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सुरु करावयाच्या १०० निवासी शाळांची ठिकाणे मा. मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन निश्चित करण्यात येतील.

५. याबाबत संचालक, समाज कल्याण, पुणे यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सदर निवासी शाळा या शासनामार्फत सुरु करण्यात येणार असल्यामुळे या निवासी शाळा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली सुरु करण्यात येतील. तसेच याबाबत येणारा खर्च या योजनेसाठी त्या त्या वर्षी करण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००६०६०१११५३४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( नं. मा. शिलवंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद

A:G.R. 1

महालेखापाल, महाराष्ट्र-१/२  ( लेखा परिक्षा) (लेखा अनुज्ञेयता ) मुंबई/ नागपूर.

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

वित्त विभाग, ( व्यय-१४/अर्थोपाय) मंत्रालय, मुंबई-३२.

अवर सचिव, अर्थसंकल्प, सा.न्या.सां.का.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.

संगणक कक्ष, सा.न्या.सां.का.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती-मावक-४.